# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 25/04/2023 (मंगळवार) सकाळ


### रेती चोरी करणाऱ्या आरोपींवर कारवाई

**पो.स्टे. खापरखेडा** :– अंतर्गत ०४ कि.मी. अंतरावर मौजा बिनासंगम शिवार येथे दिनांक २४/०४/२०२३ चे ०५/३० वा. ते ०६/०० वा. दरम्यान पोलीस स्टेशन खापरखेडा येथील स्टाफ हे पोलीस स्टेशन खापरखेडा हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना त्यांना पांढऱ्या रंगाची बोलेरो पिकअप क्र एम एच– ४० ए के –७१७९ चा चालक **आरोपी नामे– रतीराम मारोतराव जांगडे वय ४१ रा वार्ड न ०२ बिना संगम** हा अवैधरित्या विनापरवाना रेतीची वाहतुक करतांना बिना संगम शिवार येथे मिळुन आल्याने आरोपीच्या ताब्यातुन एक पांढऱ्या रंगाची बोलेरो पिकअप क्र एम एच ४० एके ७१७९ किंमती अंदाजें ३,५०,०००/– रू ज्यामध्ये एक ब्रास रेती किंमती अंदाजें ३०००/– रू असा एकुण ३,५३,०००/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी खापरखेडा पोलीसांनी, पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरूद्ध कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला असुन गुन्हयाचा पुढील तपास पोहवा उमेश ठाकरे ब. नं. १०६ पोस्टे खापरखेडा मो क्र ९९२३३८८७२२ करीत आहे.

**पो.स्टे. खापरखेडा** :– अंतर्गत ०४ कि.मी. अंतरावर मौजा बिनासंगम शिवार येथे दिनांक २४/०४/२०२३ चे ०४/३० वा. ते ०५/०० वा. दरम्यान पोलीस स्टेशन खापरखेडा येथील स्टाफ हे पोलीस स्टेशन खापरखेडा हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना पांढ–या रंगाची बोलेरो पिकअप क्र एम एच ४० बि एल ८७३९ चा चालक **आरोपी नामे– मारोती गंगाधर डाखरे, वय ३० वर्ष, रा वार्ड नं. ०२ बिना संगम** हा रेतीची अवैधरित्या विनापरवाना वाहतुक करतांना वारेगाव शिवार बिड बिना जोड येथे मिळुन आल्याने आरोपीच्या ताब्यातुन एक पांढ–या रंगाची बोलेरो पिकअप क्र एम एच ४० बि एल ८७३९ किंमती अंदाजे ३,५०,०००/–रू ज्यामध्ये एक ब्रास रेती किमती अंदाजें ३०००/– रू असा एकुण ३,५३,०००/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी खापरखेडा पोलीसांनी, पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरूद्ध कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला असुन गुन्हयाचा पुढील तपास पोहवा/३४ शैलेश यादव पोस्टे खापरखेडा मो. क्र. ९८२२३०६०६८ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर